# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

समाज कल्याण आयुक्तालय, ३, चर्च रोड, पुणे- ४११ ००१.
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१३७१८६/२६१२७५६९
ई-मेल-fs-sw-edu@gov.in

### "राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना -मुदतवाढ निवेदन"

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र.सान्यावि-२०२४/प्र.क्र.७७/बांधकामे, दि.२५.०७.२०२४ अन्वये सुधारित अटी शर्ती परदेश शिष्यवृत्ती योजनेसाठी जाहिर करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशामध्ये उच्च शिक्षणासाठी मिळावयाच्या परदेश शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०२४-२५ करिता पात्र विद्यार्थ्याकडुन अर्ज मागविण्याकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे. **सन २०२४-२०२५ करीता या अगोदर अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी पुन:श्च अर्ज करण्याची आवश्यकता नाही.**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासन निर्णयातील तरतूदीनुसार, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत अनुसूचित जाती,नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशामध्ये विशेष अध्ययन करण्यासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ शिष्यवृत्तीकरीता दि. १२.६.२०२४ चे जाहिरातीव्दारे अर्ज मागविण्यात आले असून, अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक १२.७.२०२४ असा होता.

तथापि, उपरोक्त शासन निर्णयान्वये सदर योजनेच्या अटी शर्तींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

१. <u>शैक्षणिक अर्हता</u> - परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठामधून किमान ५५ टक्के गुणांसहीत पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. तसेच पीएच.डी.अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५ टक्के गुणांसहीत पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

२. परदेशातील शैक्षणिक संस्थेने Offer Letter मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी ही संबंधीत यंत्रणेने थेट संबंधीत शैक्षणिक संस्थेस अदा करावी.

३. एकाच कुटूंबातील कमाल पात्रता धारकाबाबत दि. २५.७.२०२४ च्या शासन निर्णयातील अटी लागू राहतील

४. विद्यार्थी निवडीचे निकष -एकदा किमान शैक्षणिक अर्हता निश्चित केल्यानंतर विद्यार्थ्याच्या केवळ भविष्याच्या अनुषंगाने अधिक लाभ मिळू शकेल या दृष्टीने त्या वर्षीच्या (QS World Ranking) ची गुणवत्ता क्रमवारी लक्षात घेऊन विद्यार्थीची गुणवत्ता यादी बनवावी. दोन किंवा अधिक विद्यार्थ्यांची विद्यापीठाची क्रमवारी समान असल्यास अशा प्रसंगी त्यांच्या लगतच्या पदवी परीक्षेची गुणवत्ता लक्षात घ्यावी.

५. कुटूंबाची उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रु.८.०० लक्ष इतकी राहील.

६. विद्यार्थ्यास आकस्मिक खर्च :- विद्यार्थ्याला आवश्यक ती क्रमिक पुस्तके, वहया व स्टेशनरी, प्रबंध अहवाल तयार करणे, टायपिंग व बायडिंग, स्थानिक भेटी व इतर अभ्यास सहली प्रवास खर्च, प्रबंधनासाठी

आवश्यक खर्च, इतर प्रासंगिक खर्च. इत्यादी करीता यूएसए व इतर देशासाठी १५०० यूएस डॉलर आणि यूकेसाठी ११०० जीबीपी इतका आकस्मिक खर्च म्हणून प्रत्येक वर्षी देण्यात येतील.

उपरोक्त सुधारित अटी शर्तीनुसार सन २०२४-२५ च्या परदेश शिष्यवृत्ती करीता अर्ज मागविण्याच्या जाहिरातीस याव्दारे मुदतवाढ देण्यात येत असून आता अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक -१४.८.२०२४ रोजी कार्यालयीन वेळ सायंकाळी ०६.१५ पर्यंत ठेवण्यात आलेला आहे.

अधिक माहितीसाठी शासनाचे संकेतस्थळ “www.maharashtra.gov.in” यामधील "ताज्या घडामोडी" या लिंकवर भेट द्यावी.

**टिप - सन २०२४-२०२५ करीता या अगोदर अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी पुनःश्च अर्ज करण्याची आवश्यकता नाही.**

**(ओम प्रकाश बकोरिया)**
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.